एल.ए.आर.नं.४२/२००५
नर्मदा वि. महाराष्ट्र शासन
निशाणी क्र. ५१

अर्जदार तर्फे साक्षीदार क्र.२,

नाव- विजय भाउराव ढाले
वय- ४९ वर्षे,
व्यवसाय- नोकरी/सर्वेअर
राहणार- भुमी अभिलेख, पारशिवनी,

सरतपास अर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञ श्री. कुशवाह यांच्यातर्फे शपथेवर सुरु-

मी सध्या भुमी अभिलेख, पारशिवनी, येथे कार्यरत आहे. मला न्यायालयाचे समन्स मिळाले होते आणि मी माझ्यासोबत समन्स प्रमाणे कार्यालयातुन मुळे रेकार्ड आणलेले आहे. सर्वे नं.३२ हा नर्मदाबाइ मधुकर कुशवाह यांच्या नावाने आहे. सदर सर्वे नंबरचे १.५२हेआर क्षेत्र आहे. त्यामध्ये मोसंबीची ५० झाडे दाखवतात आणि एक विहिर आहे. परंतु पहिल्या माजणीमध्ये संत्र्याची शंभर झाडे नमुद आहेत. तसेच त्यामध्ये दोन घरे आणि एक गोठा आहे. सदर माहिती ही मी माझ्यासोबत आणलेल्या भुसंपादन रेकार्ड प्रमाणे सांगत आहे. साक्षीदाराला नि.क्र.४९ दाखविण्यात आली. साक्षीदाराने सांगितले की सदर नि.क्र.४९ मधील माहिती ही ऑफिस रेकार्डप्रमाणे बरोबर आहे. नि.क्र.४९ ची प्रमानित प्रत एल.ए.सी.क्र.३८/२००५ मध्ये आहे.

सरतपास पुर्ण.

सरतपास गैरअर्जदार क्र. १ ते ४ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. मोहरिर यांद्वारे-

२. संत्र्याची झाडे हे मी स्वतः मोजली नाहीत परंतु कार्यालयातील कर्मचारी पी.बी.बारापात्रे, परिरक्षण भुमापक यांनी केलेली होती. शंभर संत्र्यांच्या झाडाची नोंद कशी लागली हे मी सांगु शकत नाही. संत्र्याच्या झाडाची वय अभिलेखामध्ये नमुद

नाही.  झाडाची खोड किती मोठे होते यांची रुंदी नमुद नाही. प्रस्तुत अभिलेखामध्ये झाडांची वय, त्याची वाढ, त्याचा घेरा इत्यादी बाबी नमुद नाहीत. संत्र्याच्या झाडापासुन उत्पन्न किती होते याचा देखिल तपशिल अभिलेखामध्ये नमुद नाही. श्री. बारापात्रे हे सध्या कोठे नोकरीमध्ये आहे याची मला माहिती नाही.  झाडाच्या मोजणीबाबत, भुसंपादन आफिसकडुन, संयुक्त मोजनी करुन माहिती मागविण्यात आली होती.  संयुक्त मोजणी केल्याबाबतची अभिलेखामध्ये नोंद आहे. संयुक्त मोजणीबाबत संबंधीत कार्यालयाच्या अधिका-याची सही आहे, परंतु नाव नमुद नाही. झाडांची मोजणी, दुस-यांदा मोजणी करण्यासाठी गेले होते, त्यावेळेस केली आणि तसा उल्लेख अभिलेखामध्ये आहे. अभिलेखावर एम.एस.ई.बी. यांच्या कर्मचा-यांची सही नाही.  हे म्हणणे खरे नाही की १०० झाडांची लागलेली नोंद ही खोटी आहे.

उलटतपास इतर गैरअर्जदारांकरीता, -

इतर गैरअर्जदार गैरहजर सबब,उलटतपास नाही.

उलटतपास पुर्ण
फेरतपासनाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.05.11 16:46:50 +0530

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

दिनांक ११/०५/२०२६
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)